# नव्या कायद्यावर रंगली कायदेतज्ज्ञांची जोरदार जुगलबंदी

लोकमत द ग्रेट लीगल माइंड या कार्यक्रमात कायद्याच्या क्षेत्रातील अनेक दिग्गज मंडळी उपस्थित होती. केंद्र सरकारने ११ ऑगस्ट रोजी संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी लोकसभेत आयपीसी, सीआरपीसी आणि एव्हिडन्स ॲक्ट या तीन कायद्यांतील सुधारणांसंदर्भातील विधेयके सादर केली. तथापि, ही विधेयके लोकसभेत मांडण्यापूर्वी सरकारने देशातील ख्यातनाम वकील, संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांशी खुली चर्चा न केल्याने लोकांनीच निवडून दिलेल्या सरकारने महत्त्वाच्या कायद्यात बदल करताना लोकशाही पद्धतीने यावर चर्चा करणे आवश्यक आहे की नाही? या विषयावर त्यांच्याशी खुली चर्चा झाली. लीगली स्पीकिंगचे संपादक तरुण नांगिया यांनी विचारलेल्या प्रश्नांना मान्यवरांनी उत्तरे दिली. त्याचाहा आढावा...



ॲड. अमित मेहता – मॅनेजिंग पार्टनर सॉलिसिस लेक्स ॲडव्हायझरी
ॲड. संदीप सोमनाथ लड्डा – बी.ई. मेकॅनिकल एलएलबी पीजीडी पेटंट लॉ, फाउंडर एसएस लॉ फर्म
ॲड. प्रशांत कदम – ए मसिहा फॉर बडिंग लॉयर्स
डॉ. संतोष कुमार रामनारायण लाल जयस्वाल – ॲडव्होकेट रिटायर्ड जज
ॲड. गिरीश कुलकर्णी – सीनियर ॲडव्होकेट
ॲड. सुरेश पाकळे – बी.कॉम, एलएलएम, सीनियर ॲडव्होकेट
ॲड. अजित पुराणिक – फाउंडर डायरेक्टर अजित पुराणिक ॲंड असोसिएट्स
ॲड. अश्विन कुमार रामचंद्र कपाडणीस – ॲडिशनल गव्हर्नमेंट प्लेडर ॲंड असिस्टंट पब्लिक प्रॉसिक्युटर्स



ॲड. बालाजी साहेबराव शिंदे – बी.ए. एलएलबी
ॲड. भारद्वाज लक्ष्मण चौधरी – चेअरमन, तुंगश्री ग्रुप ऑफ कंपनी
ॲड. भूषण राऊत – डायनॅमिक लॉयर
ॲड. डॉ.चंचल चौधरी – फाउंडर ॲंड मॅनेजिंग पार्टनर एक्स्प्रेस लीगल कन्सल्टंट
ॲड. डॉ. गोपाळकृष्णन बालकृष्णा – पीएच.डी लॉ, फाउंडर डायरेक्टर, बीजीके लॉ असोसिएट्स
ॲड. डॉ. हितेन मेहता – फाउंडर भावसार ॲंड मेहता कं.
ॲड. जयेश आव्हाड – बी.कॉम, एलएलबी, जीडीसी ॲंड ए.डी.टी.एल, डी.एल.एल ॲंड एल.डब्ल्यू.
ॲड. मंगेश नेने – डायरेक्टर, नेने ॲडव्होकेट ॲंड टॅक्स कन्सल्टंट्स



'द ग्रेट लीगल माइंड' पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याच्या वेळी डावीकडून कॅन्सर कंट्रोल मिशन-एनजीओचे संस्थापक पुष्पेंद्र राज, व्हर्सेटाइल ग्रुपचे संचालक आनंद ठक्कर, एसएसडब्ल्यू लॉचे फाउंडर संदीप लड्डा, लीगली स्पीकिंगचे संपादक तरुण नांगिया, सीनियर काउंसिल अनिल साखरे, ॲड. सतीश माने-शिंदे, महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे स्पीकर राहुल नार्वेकर, मिरा-भाईंदरच्या आमदार गीता जैन, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आमदार ॲड. अनिल परब, माजी महाधिवक्ता ॲड. श्रीहरी अणे आणि सॉलिसिस लेक्स ॲडव्हायझरीचे मॅनेजिंग पार्टनर ॲड. अमित मेहता आदी मान्यवर उपस्थित होते.



नृत्य सरगम कथ्थक - मनाली मोहिते ॲंड ग्रुप.



लता राजेश यांच्या शिष्या - नृत्यांजली ग्रुप ठाणे.

लोकमत THE GREAT LEGAL MINDS

SOLICIS LEX Advocates and Solicitors – असोसिएट्स पार्टनर
VERSATILE your home, your style. – पार्टनर
Nationwide Cancer Control Programme CANCER - CONTROL - MISSION – पार्टनर



विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि तरुण नांगिया.

## माझ्यावर बाका प्रसंग

खासदार, आमदार जेव्हा लोकसभा, विधानसभेत बोलतात, तेव्हा ते त्यांच्या मतदारसंघाच्या वतीने बोलत असतात. नागरिकांचा आवाज प्रतिध्वनीत होत असतो. संसदेत, विधानसभेत बहुसंख्यांचा आवाज चालतो. कायदा तयार करण्यासाठी वकिलांची आवश्यकता आहे, असे नाही. अन्य लोकांच्या तुलनेत वकील कायद्याचा चांगला मसुदा तयार करू शकतो. एखाद्या विषयाची आमदाराला सखोल माहिती असेल आणि तो त्याच्या मतदारसंघाशी बांधिल असेल तर तो नक्कीच चांगला कायदा बनवू शकतो. विधी समिती ही विधिमंडळाचा आत्मा असते. त्यांना कायदा बनविण्याची टास्क दिली जाते आणि त्यासाठी त्यांना आवश्यक असलेला कालावधीही दिला जातो. परंतु, विधानसभेत मंजूर केल्याशिवाय कायदा अंतिम होऊ शकत नाही. राज्याच्या इतिहासात कधीही न घडलेली घटना माझ्या कारकिर्दीत घडली आहे आणि ही समस्या सोडविण्याचे काम माझ्यावर सोपविण्यात आले आहे. माझ्यापेक्षा वरिष्ठ असलेल्या व काही वर्षांपूर्वी ज्यांच्या निर्देशांनुसार वागलो, त्याच वरिष्ठांबाबत निर्णय घ्यायचा आहे; हे इंटरेस्टिंग आहे.

**राहुल नार्वेकर,** अध्यक्ष, विधानसभा

## प्रत्येकाशी चर्चा करणार

केवळ वकीलच चांगला कायदा बनवू शकतात, असे गृहितक मांडणे योग्य ठरणार नाही. कारण अनेक वेळा असे दृष्टीस येते की, कमी शिकलेले; पण अनुभवसंपन्न असलेल्या व्यक्ती चांगले कायदे तयार करू शकतात. जर संसदेत क्रीमिनल वकिलांची संख्या वाढली तर ते शेतकऱ्यांसंबंधित असलेले कायदे तितक्या प्रभावीपणे बनवू शकतील का? हा प्रश्न आहे. वकील व तज्ज्ञांसाठी राज्यसभा व विधान परिषदेत जागा आहे. अन्यथा आपल्या इथे निवडणूक लढविण्याचे निकष आहेत. केवळ वकीलच नाहीतर, सुशिक्षित व लोकांच्या समस्यांची जाणीव असलेल्या लोकांची संसदेला आणि विधानसभेला गरज आहे. जर वकिलांना संसदेत किंवा विधानसभेत यायचे असेल तर त्यांना मी माझ्या पक्षात येण्याचे आवाहन करतो. त्यांना तिकीट देऊ. विधान परिषदेतही वकिलांना जागा आहे. अनिल परबांनाही त्यांच्या पक्षाने याच कामासाठी (कायद्याचा अभ्यास) विधान परिषदेवर पाठविले आणि ते त्यांचे काम चोखपणे करत आहेत, हे मी काही वर्षे पाहत आहे. तीन फौजदारी कायद्यांमध्ये बदल करताना देशातील ख्यातनाम वकील, तज्ज्ञांशी चर्चा करणार. याबाबत सर्व भागधारकांकडून हरकती-सूचना व मते मागविणार, कायदे बदलण्यासाठी सरकार घाईत नसून, मोठ्या प्रमाणावर याबाबत चर्चा घडवून आणणार.



**आशिष शेलार**
मुंबई भाजपा अध्यक्ष

## वकिलांना निवडून द्यावे

जास्तीतजास्त वकील संसदेत यायला पाहिजेत. विधान परिषदेत, राज्यसभेत वकील पाठविणे, हे पक्षाचे काम आहे. परंतु, जनतेतून वकील पाठवणे, हे लोकांचे काम आहे. सर्वसाधारण कायदा हा सर्वसामान्य माणसांसाठी असतो. त्यांना बिंदू ठेवून कायदा केला जातो. त्यामुळे लोकांनीच विचार करावा की, देशातले किती वकील लोकसभेत पाठविले पाहिजेत. अलीकडे विधेयक अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी मंजूर करतात. ही पद्धत कायद्याला मारक ठरते. विधेयकांवर संबंधित क्षेत्रातील जाणकारांकडून चर्चा झाली पाहिजे. विधान परिषदेमध्ये क्षेत्राशी निगडित लोकं घेतली जायची. आता राजकीय पक्षाचे कार्यकर्ते वेगवेगळ्या माध्यमातून येतात परंतु, कायदा योग्य व्हायचा असेल तर त्या त्या गोष्टीतील तज्ज्ञ हवेत.



**अनिल परब**
उद्धव ठाकरे शिवसेना नेते

## बदल करताना घाई नको

ठराव मांडण्यापूर्वी किंवा कायदा करण्यापूर्वी सर्व प्रक्रिया पार पाडल्या जातात. ज्यांना याबाबत ज्ञान आहे, ते जनतेसाठी काय योग्य व अयोग्य आहे, हे पाहूनच कायदा बनवितात. कायदा बनविण्यापूर्वी तो अनेक टप्प्यात पडताळला जातो. न्यायव्यवस्था, न्यायाची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा आणि प्रस्तावित कायद्यामुळे प्रभावित होणाऱ्या लोकांशी चर्चा केली पाहिजे. बार कौन्सिल, बार असोसिएशन्सशी चर्चा केलीच पाहिजे. पीएमएलए कायद्यात जामीन मिळण्याबाबत असलेल्या दोन अटी पूर्ण कराव्या लागतात. या अटी जाचक आहेत आणि सर्वोच्च न्यायालयानेही याबाबत चिंता व्यक्त केली आहे. तरीही केंद्र सरकारने त्याची दखल घेतलेली नाही. कायद्यात बदल करताना घाई करू नये.



**अनिल साखरे**
ज्येष्ठ वकील

## ऑर्बिट्रेशनच्या आदेशाची अंमलबजावणी होत नाही



**संदीप लड्डा**
फाउंडर एसएस लॉ फर्म

आपल्याकडे न्यायालयांत अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. या न्यायालयांवरील भार आणखी वाढू नये आणि व्यावसायिकांना जलदगतीने न्याय मिळावा म्हणून ऑर्बिट्रेशनची स्थापना करण्यात आली. ऑर्बिट्रेशन असलेतरी न्यायालयात जाण्यास भाग पाडले जाते. ऑर्बिट्रेटर नेमण्यापासूनच वादाला सुरुवात होते. त्यासाठीच न्यायालयात जावे लागते. ऑर्बिट्रेटर नेमले तरी त्यांच्याकडेही वेळ नसतो. दावा निकाली काढण्यासाठी कालावधी कायद्यात नमूद केला आहे. परंतु; तो वाढविण्यासाठीही न्यायालयात जावे लागते.

## बार कौन्सिलला विचारा

सरकारने कायदे बदलासंदर्भात हरकती-सूचना मागविल्यातरी वकील तसे करण्यास उदासीन असतात. कारण सरकार आपल्या सूचना स्वीकारेल की नाही आणि आपल्याकडे तेवढा वेळ आहे का? या दोन बाबींची त्यांना चिंता असते. आपल्याकडे लॉ कमिशन सारखी यंत्रणा आहे. मात्र, त्यांच्याकडे पुस्तकी ज्ञान आहे. प्रत्यक्ष अनुभवाची कमतरता आहे. कायद्यात बदल करताना बार कौन्सिलचे मत विचारात घ्यावे व त्यांच्याद्वारे त्या विषयावर चर्चासत्र घडवून आणावे. शेलारांनी सभागृहात उपस्थित असलेल्या वकिलांना भाजपमध्ये सहभागी होण्याची ऑफर दिल्यानंतर, निकम यांनी वकिलांना स्वतंत्रपणे सूचना करण्याची मुभा मिळेल का? वकील पक्षात सहभागी झाले तर त्यांना पक्षाच्या अजेंड्यानुसार चालावे लागेल. अशा स्थितीत ते स्वतःची स्वतंत्र मते मांडू शकतात का? माफीच्या साक्षीदाराला योग्य साक्ष दिली, तर खटला संपेपर्यंत कारागृहात राहावे लागते. त्याने साक्ष दिल्यानंतर प्रकरण संपते. सर्वोच्च न्यायालयानेही अशा प्रकारे माफीच्या साक्षीदाराला कारागृहात सडविण्याबाबत चिंता व्यक्त केली होती. त्याकडे सरकारकडून दुर्लक्ष करण्यात आले आहे. सरकारने नवीन विधेयके अंतिम करू नयेत. अद्यापही वेळ गेलेली नाही. त्यांनी बार कौन्सिलकडे चर्चा करावी. त्यावर सार्वजनिक चर्चासत्रे घडवून आणावीत.



**उज्ज्वल निकम**
विशेष सरकारी वकील

## पायाभूत सुविधाही पुरवा

कायद्यात बदल करताना सर्वात शेवटच्या व्यक्तीला न्याय मिळणार नसेल तर; काय फायदा? कायद्यात बदल करताना सर्व भागधारकांचे मत विचारात घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सर्व पायाभूत सुविधाही उपलब्ध होतील, याची काळजी घेणे आवश्यक आहे. कित्येक वर्षे लोक न्यायाच्या प्रतीक्षेत असतात. न्यायाधीशांची संख्या वाढविणे, हे अत्यावश्यक आहे.



**सतीश मानेशिंदे**
वकील

## परदेशी लॉ फर्म भारतात?

सरकार परदेशी लॉ फर्म भारतात आणू इच्छित असले तरी त्यात अनेक अडथळे आहेत. परदेशी कंपन्यांचे डॉक्युमेंटेशनची पद्धत वेगळी आहे आणि भारतात अद्यापही पूर्णपणे अंमलात आलेली नाही. आपल्याकडे आधीच पायाभूत सुविधांचा अभाव आहे आणि आपले वकील अद्याप प्रशिक्षित नाहीत. आपल्या लॉ फर्म अजून सज्ज झालेल्या नाहीत. देशातील ३०० ते ४०० लॉ फर्म संपूर्ण देशातील कॉर्पोरेटचा भार सहन करत आहेत. त्यामुळे आपण परदेशी लॉ फर्मला भारतात येऊ द्यावे.



**अमित मेहता**
मॅनेजिंग पार्टनर सॉलिसिस लेक्स ॲडव्हायझरी



ॲड. मनीष बलानी – मनीष असोसिएट्स प्रोप्रायटर
ॲड. मनीषा चव्हाण – डायरेक्टर, सिद्धिविनायक असोसिएट्स
ॲड. मीनल बी. खोना – ॲडव्होकेट हायकोर्ट, मुंबई
ॲड. नेहा भिडे – बी.एससी, एलएलबी
ॲड. नेहा दुबे – इंडिपेंडंट लॉयर ॲंड सोशल वर्कर
ॲड. पंकज बाफना – फाउंडर बाफना लॉ असोसिएट्स
ॲड. पराग प्रदान – अ लॉयर विथ डिफरन्सेस
ॲड. परेश देसाई – डायरेक्टर, ब्रेन्स2रिजॉल्व, लीगल सोल्युशन एलएलपी



ॲड. प्रणील किशोर सोनवणे – रिटेनिंग लीगसी इन मॉरल एक्सिलेन्स
ॲड. प्रतिभा बंगेरा – फाउंडर, टॉपरिजुरीएस लीगल कन्सल्टंट्स
ॲड. प्रीती पाटील-जाधव – इंडिपेंडंट लॉयर ॲंड सोशल वर्कर
ॲड. रमेश त्रिपाठी – सक्सेस ऑफ सीनियर ॲडव्होकेट एम.ए., एमजे, एलएलबी, एलएलएम रमेश त्रिपाठी ॲंड असोसिएट्स
ॲड. सागर पवार – सिव्हिल लॉयर
ॲड. संदीप राजाभाऊ लोंढे – बीएसएल, एलएलएम, फॅमिली ॲंड क्रिमिनल लॉयर
ॲड. संगीता पहड – स्पेशल पब्लिक प्रॉसिक्युटर सीनियर कौन्सिल मिरा-भाईंदर म्युनिसिपल कॉर्पोरेशन
ॲड. संजय मोरे – फायर ब्रँड पब्लिक प्रॉसिक्युटर्स ऑफ ठाणे



ॲड. संतोष यादव – इंडिपेंडंट लॉयर सपोर्टेड बाय अर्बन अॅनॅलिसिस ॲंड सोल्युशन्स कन्सल्टन्सी सर्व्हिसेस
ॲड. शैलेश शहा – फॉडली नोन ॲज द '360 डिग्री ॲडव्होकेट' प्रोप्रायटर, शाह ॲंड असोसिएट्स
ॲड. शेखर जगताप – बीएसएल, एलएलएम डीएसीएल, पीएच.डी स्कॉलर
ॲड. शिरिष बोरकर – सिव्हिल लॉयर
ॲड. सिद्धार्थ इंगळे – इंडिपेंडंट लॉयर, फाउंडेड कचेरी ॲंड असोसिएट्स
ॲड. स्वप्ना प्रमोद कोडे – डिफेन्स क्रिमिनल लॉयर
ॲड. तुषार गोरडीया – फाउंडर, तुषार ए. गोरडीया ॲडव्होकेट्स
ॲड. विभूती अग्रवाल – इंडिपेंडंट लॉयर